# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : १३/११/२०२३

# प्रेसनोट

## उल्हासनगर शहरातील हवेचे प्रदुषण नियंत्रित ठेवण्यासाठी नागरिकांना टोल फ्री कमांकावर तक्रार नोंदविता येईल.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मागील आठवडयामध्ये हवेच प्रदुषण वाढत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांनी तातडीने सहा. संचालक नगररचना, सर्व सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी तसेच पर्यावरण विभाग यांना आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उल्हासनगर शहरात सुरु असलेल्या एकुण १९० बांधकामांना नगररचना कार्यालयांमार्फत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत उल्हासनगर शहरातील फटाका विक्रेत्यांच्या दुकानांना भेटी देवून मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले जात असल्याबाबत खात्री केली जात आहे.

दिनांक १२/११/२०२३ रोजी दिवाळी दरम्यान लक्ष्मीपुजन असल्यामुळे उल्हासनगर शहरात मोठया प्रमाणात फटाके फोडण्यात आले असल्याने दिनांक १३/११/२०२३ रोजी हवा गुणवत्ता निर्देशांक वाढत असल्याचे निदर्शनास आल्याने सदरहु बाब गंभीरतेने घेऊन मा.प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांनी नगररचना विभागामार्फत मा. न्यायालयाने हवेचे प्रदुषण नियंत्रित ठेवण्यासाठी उपाययोजना करणेबाबत ज्या बांधकामांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत त्या बांधकामांना तात्काळ भेटी देवुन नोटीसीत दिलेल्या निर्देशांचे पालन होत नसल्याची बाब निदर्शनास आल्यास तात्काळ काम बंद करण्यात यावे असे आदेशित केले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल PIL NO.३ OF २०२३ मध्ये दिनांक १० नोव्हेंबर २०२३ रोजी हवा प्रदुषण नियंत्रणाचा भाग म्हणुन दिवाळी सणामध्ये रात्री ८.०० ते रात्री १०.०० वा. या कालावधीत तसेच नाताळ व नविन वर्षाचे स्वागत करणेसाठी रात्री ११.५५ ते रात्री १२.३० वा. या कालावधीत फटाके फोडण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालाने दिले आहेत, त्याचे पालन करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे कमीत कमी वायु व ध्वनी प्रदुषण करणारे फटाके फोडावेत व आपल्या शहराची हवा स्वच्छ ठेवण्यास सहकार्य करावे. त्याचप्रमाणे उल्हासनगर शहरामध्ये विविध कारणाने हवेचे प्रदुषण होत असल्याची बाब निदर्शनास येत असल्यास नागरिकांना टोल फ्री १८००२३३११०१ या क्रमांकावर तक्रार नोंदविता येणार असल्याबाबत आवाहन केले आहे.

(छाया प्रकाश डागळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.